| MHLA140012252025 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ३१९/२०२५</u>**<br>पार्वतीबाई बाबुराव सुरवसे व इतर<br>वि.<br>बिरु ग्याना सुरवसे व इतर |
|---|---|

## <u>नि. १९ खालील आदेश</u>

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६, नियम ९ प्रमाणे कमिशन नेमणेकरिता दाखल केला आहे.

**२.** वादींच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी हे लगतचे शेतशेजारी आहेत. वादग्रस्त जमीन ही मौजे लिंबाळा दाऊ ता. औसा जि. लातुर येथील गट क्र. १४४/क येथील जमीन असुन वादी क्र. १ हे ० हे. ५८ आर आणि वादी क्र. २ हे ०० हे ५९ आर जमीनीचे मालक व कब्जेदार आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये गट क्र. १४४/क वरुन वाद आहे. त्यामुळे वाद मिळकतींची एकत्रित मोजणी सरकारी मोजणी कार्यालयाकडून होणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीचे हद्दी निश्चित होऊन अतिक्रमित क्षेत्र निश्चित करता येणार आहे. त्यामुळे सत्य परिस्थिती कोर्टासमोर येणेकरिता मा. उप–अधिक्षक भूमी अभिलेख तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख औसा यांचे कार्यालयाकडून मोजणी होणेबाबत आदेशित करावे अशी वादीने विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द म्हणणे नाही चा आदेश पारीत करण्यात आला.

**४.** अर्ज वाचला. प्रकरणाची पाहणी केली. तसेच वादीच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादीं विरुध्द कायम मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रत्यक्ष जागेवर अतिक्रमण किती प्रमाणात झाले हे वादीच्या व प्रतिवादींच्या क्षेत्राची मोजणी झाल्यावरच कळेल. त्यानुसार अतिक्रमण काढून घेण्याच्या दाव्यामध्ये लगतच्या क्षेत्राची मोजणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वे क्र. १४४/क या मिळकतींची एकत्रित संपूर्ण मोजणी होणे आवश्यक आहे.

त्याकरिता कोर्ट कमिशनची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्याद्वारे वादींच्या हद्दीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले आहे किंवा नाही ही बाब प्रत्यक्ष जागेवरचा ताबा पाहून, तो ताबा तसा नमूद करुन त्याबाबतचा अहवाल कोर्ट कमिशन यांनी दिल्यावर दिसुन येईल. त्यामुळे न्यायालयाला दाव्यातील मूळ मुद्दा निकाली काढणेस मदतच होईल. एकंदरीत वरील सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**०१**. वादीचा निशाणी क्र. १९ प्रमाणे मोजणीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांनी मौजे लिंबाळा दाऊ, ता. औसा येथील गट क्र. १४४/क मधील संपुर्ण जमीन पोटहिस्सासह, पोट खराबसह वादी व प्रतिवादींची जमीनीची संयुक्तीक मोजणी करुन वादी व प्रतिवादींच्या च्या मालकी कब्जेच्या जमीन गट क्र. १४४/क मधील जमीनीची हद्दी, खुणा व बांध कायम कराव्यात. तसेच अतिक्रमीत क्षेत्र असल्यास दर्शवुन त्याचा न्यायालयीन आयुक्त यांनी आयुक्त पत्र मिळाल्यापासून **दोन महिन्यांच्या** आत नकाशा व अहवाल दाखल करावा.

**०३**. वादी व प्रतिवादी यांनी उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांच्या कार्यालयात त्यांच्या सूचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयुक्त पत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**०४**. वादी व प्रतिवादींनी ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसूल आणि इतर कागदपत्रावर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती व १ छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

**०५**. आयुक्तांला **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी व्यवहार नियमावलीतील प्रकरण क्रमांक०८**

**परिच्छेद १५१ ते १७०** व महसूल नियमातील आवश्यक नियमांचा अवलंब करुन आयुक्ताचे कार्य सत्वर पूर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयुक्तांचे काम काही अपरिहार्य कारणामुळे ठरवून दिलेल्या मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करुन मुदत वाढ मागू शकतात.

**०६.** उभय पक्षांना जातीने अथवा विधिज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

**०७.** न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाचा ठरलेला दिवस, तारीख व वेळेची सूचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळविण्याबाबत निर्देशित करण्यात येते.

**०८.** वादीने न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरुप व हेतूचे आकलन होण्यासाठी वादपत्र व कैफीयतीच्या प्रमाणित प्रती देण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०९.** जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करुन आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारांसमक्ष पूर्ण करावे.

**१०.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात येतो.

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.07.08 17:25:40 +0530

**(एस. डी. साबळे)**

**दिनांक : ०८.०७.२०२६.** **२रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**

**ठिकाण : औसा.** **औसा, जिल्हा लातूर.**